ISSN 2319 - 720X

Volume 1, Issue-2, Raigad May-July 2013 Pages : 136 Price : ₹ 350/-

# A peer reviewed International Journal of Multi-disciplinary Research

Editor -in-ch[illegible]

Dr. Yo[illegible]hendra W[illegible]

ISSN: 2319-720X

# SHORYABHUMI

*A peer reviewed International Journal of Multi-disciplinary research*

## CONTENTS

1. **Heritage Management Strategy: An Urgent Need to Preserve Tangible and Intangible Cultural Heritage of Rakhine (Myanmar)** 1-8
*Dr. Vinay Kumar Rao*

2. **Evaluation of antimicrobial and Bioactivity guided studies in the methanol extracts of Excoecaria agallocha mangrove species** 9-13
*Dr. B. G. Pagare and Dr. B. L. Jadhav*

3. **Opportunities and Strategies for Halal Food Business to enter Indonesian Market** 14-17
*Dr. Srawut Aree*

4. **Economic Evolution of Women in Afghanistan** 18-21
*Atoosa Bahadori*

5. **Power and Gender/Sexual Politics: A Theoretical Study of Cloud Nine by Caryl Churchill** 22-25
*Vanlalchami*

6. **A critical study of Bedil as a Prose Writer** 26-28
*Dr Mazhar Alam Siddiqui*

7. **Management Education in India: Problems and Prospects** 29-31
*M.M. Bagban and Dr. R. B. Teli*

8. **The Promise and Peril of Civil Society in Russia** 32-37
*Harshad Bhosale*

9. **Enhanced / Imposive marginalization of the special attention group in the era of globalization (A study of 'snehankit' an Association for non-seeing friends and the two popular colleges in Pune city)** 38-42
*Meena Vinod Ranpise*

10. **Mindfulness Meditation: The path to Nirvana** 43-45
*Paranee Chiarakiat*

11. **Learning Soft Skills for personality Development** 46-48
*Dr. Anuradha Devidas Limkar*

12. **Inclusion of Women and Minority in Development** 49-52
*Dr. Deepika Singh*

13. **Perspectives of Commerce Students' towards Higher Education (A Study of Navi- Mumbai)** 53-56
*Bhorkade Yashwant Sayabu*

14. **The Voice of Tibetan Women in exile:** 57-60
*Limakumla*

15. **Patriarchy and Capitalism: Thinking Private/Private Distinction in Socialist Feminism** 61-68
*Latief Ahmad Dar*

16. **Wireless Sensor Networks for Monitoring Physiological Signals of Multiple Patients** 69-73
*Z. B. Pathan, and Ansari Faheem Ahmed*

17. **A Study of Jaggery in Maharashtra With Special Reference To Kolhapur District** 74-76
*Kshirsagar Vikas Vasant*

18. **Environment and Development in Sikkim** 77-82
*Girija Khatiwara*

19. **Influence of Parenting Style on Juvenile Delinquency**
*Helkar Sunanda* 83-85

20. **Can Legislation Be A Solution? A Case Of Domestic Workers**
*Kalpana Prasad* 86-91

21. **To measuring the attitude between Ashram school student and Urban school student**
*Kalpana S. Nagare* 92-94

22. **हिंदी के गिरिराजशरण अग्रवाल तथा मराठी के प्रदिप निफाडकर की गजलों में व्यक्त सकारात्मकता - एक विवेचन**
*Dr. Vitthalsingh Dhakare* 95-97

23. **हिंदी साहित्य में म.गांधी का व्यक्तित्व और दर्शन**
*Prerana Ubale* 98-100

24. **मराठी लोकगीतों में राम का स्वरुप**
*Dr. Arjun Gharat* 101-102

25. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रातील निसर्ग**
*Dr. Madhavi Kharat* 103-105

26. **संत कबीर - एक द्रष्टा व मार्गदर्शक**
*Dr. M. M. Ramteke* 106-109

27. **वाढते वय आणि समस्या**
*Dr. Unmesh Kulkarni* 110-111

28. **भटक्या विमुक्त समाजातील आत्मकथने**
*Dr. Dhanaji Gurav and Daulatrao Kamble* 112-114

29. **मराठी कवितेतील मन**
*Dr. Vaijantimala Jadhav* 115-120

30. **राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झालेल्या युवकांचा व्यक्तिमत्व विषयक अभ्यास**
*Dr. Ishvar Patil* 121-123

# मराठी कवितेतील मन

* Dr. Vaijantimala Jadhav

मराठी कवितेला ७०० वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा आहे. संतकविता, पंडितकविता, शाहिरी कवितेने आपापल्या परीने मराठी कवितेत महत्त्वाची भर घातली. संतकविता ही भावनेला महत्त्व देणारी आत्मपर आणि स्फुट स्वरुपाची आहे. बहुतेक सर्व प्राचीन, संस्कृत, मराठी कविता अभंग वा ओवी या प्राकृत छंदातून प्रकट झाली आहे. पंडित कवींची सर्व कविता बव्हंशी संस्कृत महाकाव्यावर आधारित होती. संतांच्या कविमध्ये येणारे अनुभव हे आंतरिक जीवनाशी संबंधित असे अंतर्निष्ठ स्वरुपाचे होते. तसे पंडित कवितेचे नव्हते. या कवितेत आत्मभानाला महत्त्व नव्हते. महाकाव्यातून आलेल्या पुराणकथांचा फक्त परिचय पंडिती कवितेतून करून दिला जाऊ लागला. त्यामुळे पंडित कविता ही पंडित कवींचे आत्मभान पूर्णपणे नष्ट करून निर्माण होत गेली. या कवितेने त्या त्या काळाशी संवादी भाष्य न करता एक यांत्रिक स्वरुपाची रचना केली आणि ती मराठी साहित्याच्या इतिहासात स्थिर झाली. तर शाहिरी कवितेने आपल्या कवितेतून वीर रसाचा परिपोष घडविला.

मध्ययुगीन कवितेपेक्षा आधुनिक मराठी कविता ही सर्वच बाबतीत वेगळी दिसते. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत ही कविता स्वत:चे एक नवे रूप घेऊन आली. मराठी काव्याला जे नवे रूप प्राप्त झाले त्याचे मूळ येथे नव्याने आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनात होते. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्या प्रस्थापनाद्वारे वर्णजातिभेदाचे निर्मूलन करण्याची संधी भारतीय संस्कृतीला मिळत होती. मराठी काव्यात ही संकल्पना केशवसुतांनी आणली. यानंतरच्या सर्वच कवींना मराठी काव्याला आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही अंगांनी नवे रूप दिले, आत्मप्रत्यय हा आधुनिक कवितेचा एक महत्त्वाचा घटक बनला. कविता हा लेखनप्रकार कवीच्या संवेदनशीलतेशी निगडीत असतो. आपल्या कवितेतून कवी आत्मानुभवाचे प्रकटीकरण करत असतो. कवीचे मन, त्याचे अनुभव त्याची अभिव्यक्तीचा रीत हे घटक कवितेतून वाचकाला प्रत्ययाला येतात. कवी मानवी मनामध्ये ज्या विविध अनुभवांचा, संवेदनांचा खेळ चालू असतो. त्याला काव्यातून प्रकट करतो. तर कधी मनावरच विविध प्रतिमा-प्रतिकांचा आरोप करून थेट मनाचे चित्रण कवितेतून करतो. प्रस्तुत लेखामध्ये एकूणच मराठी कवितेमध्ये हे मन कसे डोकावते याचा शोध घेतला आहे. कधी जागृत अवस्थेत, कधी अर्धसुप्त अवस्थेत तर कधी सुप्तावस्थेत असलेले मानवी मन कवितेच्या माध्यमातून वाचकांजवळ कसे येते हे पाहिले आहे. काही कवी अगदी सहज रीतीने मनाला जे वाटते, जे भावते त्याची दखल घेतात. तर संतकवींमध्ये रामदासांसारखे संतकवी मनाला उपदेश करताना मनाचे श्लोकच लिहितात.

संतकवितेचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की जवळपास सर्वच संतकवी हे मानवी मनाला अतिशय महत्त्व देतात. विशेषत: माणसाने कसे वागावे कसे वागू नये याचा उपदेश ते मनाला करतात. तर कधी विठ्ठलाच्या भेटीने मनाला झालेला आनंदही आपल्या अभंगातून व्यक्त करतात. पांडुरंगाला भेटायला जाताना चित्ताची जी व्याकूळता आहे ती अतिशय सहजतेने संतकविता प्रकट करते.

उदा.

ऐसे सुखरूप दोघे चालताती मार्गी ।
परी चित्त पांडुरंगी नामयाचें ।
क्षणाक्षणा वास परतोनी पाहे
वियोगन सोह पंढरीचा (नामदेवगाथा पृ. १२)

नामदेवांचे सारे लक्ष पंढरपूरच्या पांडुरंगाजवळ आहे. नामदेवांचे कविमन हे मूलत: भावव्याकूळ भक्ताचे मन आहे. भक्तीच्या अनावर उमाळ्यांची ईश्वराला अखंड अभिषेक करण्यात ते दंग झाले आहेत. नामदेवांच्या या विवक्षित मनोधर्माचा एक परिणाम परमेश्वरविषयक अनिवार, आसक्ती, आत्मनिवेदन, विठ्ठलाशी मांडलेला प्रेमकलह शरणागती या भावना व्यक्त करणाऱ्या अभंगाच्या निर्मितीत होतो.''[१] (खोले : भक्तिशोभा) दैनंदिन जीवनव्यवहारातील क्षणभंगुरता, त्यांनी आपल्या कवितेतून स्पष्ट केली. मानवाने आपले मन शुद्ध ठेवावे व आत्मविकासाची कास धरावी अशी भूमिका त्यांनी आपल्या कवितेतून मांडली, प्रसंगी विठ्ठलाला मानवी रूप देत त्यांनी मनाने अहंकार सोडावा याचा उपदेश केला. एकनाथांनीही आपल्या अभंगरचनेतून निरभिलाष, नि:स्वार्थी, निरपेक्ष भावनेतून माणसाने वागले पाहिजे असे सांगितले आहे.

उदा.

मनें धने कर्तव्यता ।
ज्याची अनन्य अवंचकता
त्या नाव परममित्रता

ज्ञानदेवांनी विश्वक भावनेने मागितलेले पसायदान आत्मोन्नतीकडे जसे घेऊन जाणारे आहे तसेच एकनाथही साऱ्या समाजबांधवात, अखिल मानवसृष्टीत परस्परांत मित्रत्वाची भावना जागृत रहावी असे मागणे मागतात.

संतकवितेची रचना ही पारमार्थिक जीवनव्यवहाराचे एक अंग होती. त्यातून आध्यात्मिक जीवनदृष्टी प्रत्ययाला येत होती. प्रसंगी अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी आत्मसामर्थ्य प्राप्त झाल्यानंतर किती सहज घडतात. ते या संतकवितेतून प्रत्ययाला येते. मुक्ताबाईंनी ज्ञानेश्वरांना लडिवाळपणे

योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा
विश्वरागे झाले वन्ही । संत सुखे व्हावे पाणी ।।

असे म्हटले असले तरी त्यामध्ये अधिकारवाणीने समाजाप्रती असणारे संतांचे कर्तव्यही समजावून सांगितले आहे. संतांचे मन, संतत्वाचे स्वरूप याविषयी मुक्ताबाईचे ताटीचे अभंगामधून जो उपदेश केला त्याने माणसाचे व्यक्तित्व अंतर्बाह्य पालटून जाते.

संतांची अभंगवाणी ही आत्मप्रत्यय व्यक्त करत परतत्त्वाला स्पर्श करते. त्यासाठी भाषिक पातळीवर अनेक प्रकारे प्रतीकात्मक वास्तवाची निर्मिती ती करते. माणसाच्या चित्तवृत्ती, त्याचे मन यांना उपदेश करत तर कधी योग्याचे मन कसे असते हे सांगत ती ईश्वरी तत्त्वाच्या सर्वव्यापी स्वरुपाशी एकरूप होते.

मना सज्जना भक्तिपंथेची जावे
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।

* Assistant Prof., Dept. of Marathi, Modern College of Arts, Science & Commerce, Shivajinagar, Pune, (MS), India

जनी निंद्य ते सर्व सोडोनी द्यावे
जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।

यासारख्या मनाच्या श्लोकातून रामदासस्वामी व्यक्तिगत आणि सामुहिक स्तरावर माणसाने कसे वागावे याचाच उपदेश करतात. मानवी जीवनाकडे पाहण्याची मूलगामी दृष्टी संतकवितेने माणसाला दिली. मानवी मनाच्या विविध भावावस्था प्रकट करत या कवितेने जीवनातील विविध अनुभवांना सामोरे जाण्याची शक्ती सामान्यांना दिली. यानंतरच्या काळातील पंडित कवींमध्ये मुक्तेश्वराची कविता असेल किंवा श्रीधर-मोरोपंतांच्या कविता असेल त्यामध्ये मानवी मनाच्या तळाचा ठाव इतक्या सूक्ष्मपणे घेतलेला दिसत नाही. एकूणच प्राचीन मराठी कवितेमध्ये संतांची कविता ही आध्यात्मिक स्वरूपाची, भक्तिपर अशीच आहे.

यानंतरचा महत्त्वाचा टप्पा हा आधुनिक मराठी कवितेचा आहे. केशवसुतांच्या कवितेला मराठी कवितेच्या इतिहासात एक नवे युग सुरु करण्याचे श्रेय आहे. आपल्या परंपरेतील सर्जनाचे आध्यात्मिक-गूढवादी सूत्र पुनरुज्जीवित करण्याचे प्रयत्न केशवसुतांनी केले. मध्ययुगीन कविता परमेश्वरकेंद्री होती. केशवसुतांनी तिला मानवकेंद्री केले. कवी वास्तवाला आकार देऊ शकतो. या भावनेमुळे कवितेत अनेक विषय येऊ लागले. मानवी मनाला कवी प्राधान्य देऊ लागले. दैनंदिन भाषा, तिच्यातील शब्दप्रयोगांचा वापर कवी करू लागला. केशवसुतांनी पाश्चात्य रोमॅंटिक काव्यातून प्रेरणा घेऊन स्वत:च्या व्यक्तित्वाच्या सामर्थ्याने मराठी कवितेला नवे वळण दिले. केशवसुतांनी निर्माण केलेल्या या नव्या प्रवाहाला त्यांचे समकालीन टिळक, विनायक, दत्त आणि पुढील पिढीतील गोविंदाग्रज, बालकवी, रेंदाळकर, नागेश इ. कवींनी आपापल्या प्रकृतिनुसार, वृत्ती वैशिष्ट्यानुसार चालना दिली. वेगवेगळ्या भावविश्वाचा त्यांनी विकास केला. ही कविता बहिर्मुखतेपेक्षा अंतर्मुखतेला प्राधान्य देते. बालकवींच्या कवितेतून याची प्रचीती येते. बालकवींना हे जग दु:ख आणि संकटांनी भरलेले दिसते. जगाचा खोटेपणा आणि उफराटेपणा त्यांना जाणवतो आणि त्या जाणिवेने ते अस्वस्थ होतात. काळाच्या कराल दाढा आपल्यासह सगळ्या जगाचा चुराडा करायला टपलेल्या आहेत. अशी त्यांची प्रतिती आहे. म्हणून याच वयात त्यांनी या जगाकडे पाठ फिरवलेली दिसते. पंथ या कवितेत ते म्हणतात,

'मन्मना जगाचा पंथ तुझा नच कांती'
तव पंथ, दुजा हा सोड वेगळा होई.

असे ते स्वत:च्या मनाला बजावतात. तर कधी शांतपणे डोलणारी झाडे, कूजन करणारे पक्षी, हसणारे चांदणे यामुळे आनंदाने गाण्यासाठी त्यांचे मन मोकळे झाले आहे. बालकवींनी आपले बरेचसे काव्यात्म अनुभव हे लहान मुलाच्या मुशीतून घेतलेले दिसतात.

त्यामुळे बालकवींचे काव्यविश्व आणि त्यांचे मूलसदृश मन यातील संवादी नात्याची सतत आवृत्त होणारी काहीशी प्रतीकरूप घेत जाणारी प्रतिमा म्हणजे 'गाणे' ही कविता होय.

उदा.

रम्याकार चमत्कृतिप्रचुर हे ब्रह्मांड नेत्री दिसे
खेळे काहीतरी त्यातुनि, मनी गाणे तदा होतसे

एकीकडे चेतन मनाला जाणवणारे बाह्य विश्व आहे आणि दुसरीकडे कवीचे अचेतन मन आहे. या दोहोंना सांधणारे बाह्य विश्वावर सौंदर्याची प्रक्रिया करणारे प्रेमतत्व बालकवींची कविता आविष्कृत करते.

बालकविंचे काव्यविश्व हे बालस्वरूप संज्ञेने नियत झालेले आहे. ते निसर्गसंबद्ध आहे. त्यात एक प्रकारची आदिमता आहे. निसर्गाची आदिमरूपे जणू या कविमनाबरोबरच सोबतीला येतात असे वाटते. हे मन सगळ्या निसर्गाचा अनुभव घेते. ''या आविष्कारातून बालकवीचे व्यक्तिमन व्यक्त होण्यापेक्षा त्यांना माध्यम करून मानवजातीचे शिशुमन व्यक्त होत आहे असे म्हणणे अधिक उचित होईल. त्याचे नाते मानवाच्या सामूहिक अचेतनाशी (कलेक्टिव्ह अनकॉन्शस) अधिक आहे. हे मन एका गर्भकोशसदृश विश्वात वावरणारे आहे. हे विसरून चालणार नाही.'' (म. सु.पाटील, 'बालकवींचे काव्यविश्व, पृ. ३७)

बालकवींनंतरच्या कवींच्या काव्यकल्पनेतूनही मनाच्या विविध भावावस्था प्रकट झालेल्या दिसतात. अवतीभोवतीच्या जीवनाशी समरस होत, अदृश्य जगाच्या विषयीचे गूढ आकर्षण व त्यांची प्रेमश्रद्धावृत्ती यातून तांब्यांच्या कवितेत त्या परमेश्वराविषयीची प्रेमाची आर्त तळमळ व्यक्त होते.

मना वृथा का भिशी मरणा ?
दार सुखाचे ते हरि करुणा

सामान्य माणसाचे मन मृत्युला घाबरते. या असे याच्या भीतीचे प्रगटीकरण तांब्यांची कविता करते. केशवसुत, बालकवी, टिळक, चंद्रशेखर, गोविंदाग्रज यासारख्या कवींनी मराठी वाचकांमध्ये काव्यविषयक उत्साहाचे वातावरण तयार केले.

याच कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या अर्वाचीन मराठी कवयित्रींच्या कवितेतून मानवी मनाचा नेमका कसा विचार केला आहे हे थोडक्यात पाहिले आहे. लक्ष्मीबाई बेहरे, मनोरमाबाई नावलेकर, विमलाबाई, देशपांडे, काशीताई नाटेकर, मनोरमाबाई रानडे, बहिणाबाई चौधरी या कवयित्री काव्यलेखन करीत होत्या. त्यापैकी काशीताई नाटेकर आणि मनोरमाबाई रानडे, बहिणाबाई चौधरी या कवयित्रींनी आपापल्या पातळीवर मनाचा शोध घेतलेला दिसतो.

काशीताई नाटेकरांनी 'अभंग' या काव्यरचनाप्रकाराचे आत्माविष्कारासाठी स्वीकार केला. ''एका दृष्टीने मानवी मन व अभंग यांचे एक अतूट नाते आहे. मराठी मनातील भक्ती ही अभंगनिर्मितीची प्रेरणा असली तरी कारुण्यातच खऱ्या अर्थाने तिचे लावण्य व सौंदर्य आहे. ज्या मनाने जीवनाच्या प्रारंभीच जीवनाचे सम्यक दर्शन घडून त्याचे महत्त्व व अर्थशून्यता उमगते ते मन अटळपणे अभंगरचनेने वळताना दिसते.'' (चिडगोपकर अलका: अर्वाचीन मराठी कवयित्री, पृ. २१०)

कवयित्रीने आपल्या संपूर्ण भावोत्कट मनाच्या विविध अवस्था त्यातील विविध भाववृत्तीसह प्रकट केल्या आहेत.

उदा.

फाड माझे बा हृदय
सांग आत दिसे काय?
जैसे दिसते बाहेरी ।
तैसे नाही का अंतरी ?
मन निर्मख आरसा
उजळिला तेजे जैसा ।
करोनिया शांत मन
छहा कसाला लावून ।।

(निवांत-काशीताई नाटेकर, अभंग ३, पृ.क्र. १४)

मनाला निर्मख आरसा कल्पून कवयित्री संवेदनशील मनाची रोजच्या जगण्यात जी कोंडी होते त्याचे वर्णन करते. परमेश्वराला भेटण्याची ओढ तर कधी आयुष्यातील इतर सुख-दु:खे यामुळे मनाची अवस्था कशी बदलते याचा आलेख कवयित्री कवितेतून मांडते.

अशाच स्वरूपाने मराठी काव्यप्रांतात मनाच्या तळाचा ठाव घेण्याचा प्रयत्न बहिणाबाई चौधरींच्या कवितेने केला. आपले जीवनानुभव ओवीबद्ध करत बहिणाबाई जीवनविषयक सत्याला सामोरे जातात. किंबहुना त्यांचा जीवनानुभव हाच काव्यानुभव असल्याचे दिसते. बहिणाबाईंची कविता ही खरेतर अर्वाचीन मराठीतील पहिली ग्रामीण कविता आहे. तिला बहिणाबाईंसारख्या तरल

संवेदनशील चिंतनशील मनाची जोड मिळाली आहे.

उदा. मन वढाय वढाय
उभ्या पिकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येत पिकावर

यासारख्या काव्यरचनेतून बहिणाबाईच्या चिंतनशील मनाची साक्ष पटते. मन हे चंचल असते. त्याला खूप गोष्टींची ओढ असते हे यातून स्पष्ट दिसते.

या कालखंडात लिहित्या झालेल्या कवी अनिल यांनी 'आत्मप्रत्यय' हाच आधुनिक काव्याचा पाया आहे असे कल्पून काव्यलेखन केले. अनिलांनी रोमॅंटिक धर्तीवर अनेक कविता लिहिल्या. प्रियकर-प्रेयसी यांच्या प्रेमसाफल्यास अनेक अडचणी, संकटे आली. याचे निर्देश या कवितेतून येतात.

उदा. सख्या रे मला -जागविसी किती वाया ?
तुझीच मन काया
तुलाच रे - वाहिले पंचप्राण
शरीर आणि मन
पहा कसेही मन शोधून
कसाला लावून
(मराठी का.मानदंड, खंड २, पृ. २५)

नायिका आपल्या मनातले दुःख अतिशय तीव्रतेने मांडते आहे. प्रेमकाव्य बरोबर अनिलांनी नव्या युगातील नव्याने आलेल्या समतावादावर तितकेच प्रभावी काव्य लिहिले.

यानंतरच्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कांतांच्या काव्यातूनही सामाजिक समतेसाठी प्रक्षुब्ध भावनेने मानवाला ओजस्वी आवाहन करणाऱ्या कविमनाचा ज्वलंत आविष्कार झालेला दिसतो. तर काही ठिकाणी त्यांच्या मनात एक विरहिणी सतत संचार करीत असते.

उदा. त्या तरुतळी विसरले गीत
हृदय रिकामे घेऊनि फिरतो तिथे टेकीत
मुक्या मना मग भार भावना
स्वरातूनी चमकते वेदना
तप्त रणे तुडवीत हिंडतो ती छाया आठवीत (पृ. ६८)
किंवा माझ्या मनात उभी तू माझे मनचि होऊन
निश्वासशी कवनात माझी वेदना बनून

एकाकीपणाचे मूळ कवीच्या भावविश्वात रुजलेले जाणवते. एकाकीपणामुळे कवीचे मन उदास होते.

१९३० च्या सुमाराला मराठी कवितेत आत्यंतिक व्यक्तिनिष्ठा स्थिर होऊ लागली होती; पण यानंतरच्या कालखंडात पाश्चिमात्य संस्कृतीच्या आगमनाने जीवनात अभूतपूर्व क्रांतीत झाली. १९३० नंतरच्या मराठी वाङ्मयात समाजवादी क्रांतीचे पडसाद स्पष्टपणे उमटलेले दिसतात. वाङ्मयक्षेत्रातील वैफल्य नाहीसे होऊन नवा ध्येयवाद तरुण साहित्यिकांना आकर्षित करू लागला. काणेकर कुसुमाग्रज, बोरकर, अनिल, कांत यासारख्या नवकवींनी नवीन ध्येयाचा स्पष्ट पुरस्कार केला. काणेकरांचा बंडखोरपणा, बोरकरांचा मानवतावाद, कुसुमाग्रजांचा क्रांतिवाद या नव्या निष्ठांनी १९३५ नंतरच्या काव्याला नवे वळण लावले. सामाजिक जीवनातल्या अश्रु, असंतोष, चीड, त्वेष इ. साऱ्या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेत आढळतात. त्याबरोबच कवी अभंगाच्या माध्यमातून आपल्या उदास मनाचे, येथील देव या कल्पनेविषयी आलेल्या निराशेचे चित्रण करतो. १९३२ ते १९३९ पर्यंत कवीचे मन कोणत्या दिशेने चाललेले होते त्याचे चित्रण त्यांनी लिहिलेल्या तीन अभंगातून दिसते.

उदा. आणि आज मन शंकित ते होई
आहेस की नाही मुळात तू

तर काही काही कवितांतून कवी रूपकांच्याद्वारा प्रेमाविषयीच्या भावना व्यक्त करतो. केशवसुतांप्रमाणे कुसुमाग्रजांनी १९३५ नंतरच्या काव्यात अंतर्बाह्य क्रांती केली, स्वप्नाळू जीवनातून वास्तवतेच्या प्रखर तेजात मराठी कवितेला त्यांनी आणले.

उदा. भीरुतेत माझ्या तुझे संगोपन
मीच केले मन रंजवाया
परततो आता रणात माघारा
शूरांना निवारा समरांत
माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार तुझ्या दारी

असा स्पष्ट पुकारा करण्याचे धैर्य कुसुमाग्रजांनीच दाखवले.

या कालखंडातील बोरकरांच्या काही कविता कविमनाच्या विविध अवस्थांचे प्रगटीकरण करतात. सश्रद्धता, आशावादी वृत्ती, गोमंतकातील लोकगीते, भारतीय अध्यात्माच्या ओढीतून बोरकरांनी गांधीजींवर आधारीत लिहिलेल्या कविता या आशयाच्या दृष्टीने संपन्न आहेत. प्रणयाची धुंदी, निसर्गसौंदर्य, थरारून टाकणारे हर्षोत्कट क्षण अनुभवताना झालेली मनाची अवस्था कवी चित्रित करतो.

उदा. मन तव चंद्रापरि करी सोबत जेथे संचित नेते ग
चराचरातून प्रेमळपण तव हासत जवळी येते ग (बोरकर)

स्त्रीच्या शारीर सौंदर्याचे, तिच्या विभ्रमाचे चित्रण करताना कविमनाची विविध रूपे बोरकरांची कविता टिपते. साहजिकच तिला विशिष्टत्वापेक्षा सार्वत्रिकतेचा संदर्भ लाभतो.

केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंतच्या पाऊणशे वर्षात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अनेक घटना घडल्या. या एकूणच कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवींनी कधी आशावादी राहून तर कधी वैफल्यवस्थेतील मनाला समजुतीच्या चार गोष्टी सांगून आपल्या कवितेतून मानवी जीवनाच्या विविध बाजूंचा वेध घेतला. मर्ढेकरांसारख्या संवेदनशील मनाच्या कवीनेही या काळातील सुशिक्षित वर्गाचे मन जाणून घेण्यासाठी या वर्गाची संज्ञा पाहिली. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत दिसते. मध्यमवर्गीय समाजमनाचे वैफल्य-सर्वंकष नैराश्य मर्ढेकरांच्या कवितेतून दिसते.

उदा. सुन्न झाले मन, सुन्न भावना या,
भोवताली पसरली रात्र-छाया
पावसाचा चुकविण्या मार घेती
पांघरूनी अंधार रस्ते
(मर्ढेकरांची कविता पृ. १०)

प्रबोधनयुगात मध्यमवर्गाच्या नेतृत्वाखाली व्यक्तिस्वातंत्र्य व मानवी समता यावर आधारलेले विश्वबंधुत्वाचे भव्य स्वप्न पाहिले गेले. विसाव्या शतकाच्या मध्यावर उभे राहून मर्ढेकर जेव्हा या स्वप्नाकडे पाहतात तेव्हा त्यांना या स्वप्नाचे तुकडे सर्वत्र विखुरलेले दिसतात. दारुण स्वप्नभंग, त्यातुन आलेले वैफल्य आणि त्यामुळे निर्माण होणारा आत्मदुरावा हा मर्ढेकरांच्या कवितेचा गाभा आहे. (कुळी स.त्र्यं.) त्यामुळे कवीची जी द्विधा मनःस्थिती झाली आहे ती पुढीलप्रमाणे कवितेतून प्रत्ययाला येते.

उदा. एकला असून। मनी दोन झालो
आता मात्र भ्यालो मला मीच ।।
किंवा "मनास पडली जर खिंडारे
भकास, थापा गाळ भितीचा,
अन धमन्यांतिल धारांवरती

बर्फ रचा मग जनरीतीचा''

कोणत्याही प्रयत्नातून मानवी दुःखाचे निवारण करूच शकत नाही, अशी कवीची धारणा काही ठिकाणी दिसून येते.

उदा. परिस्थितीचे पिऊन ॲसिड
लिबलिबली ही मने हडकुळी;
लागतील रे कधी तरी का
यांवरही तव नारळ-बकुळी!

किंवा मन वाचीन आज ना रमे,
स्मृति होते तव एकसारखी,
हूरहूर भरून ये हृदयी,
भर संध्या करी त्यात आणखी
एकाखाली एक बसलो म्हणुनीच येऊन
जग कोलाहल लांब मागुती
दगडावर त्याच,
ज्यावरी गतकाली तव स्निग्ध संगती (पृ. १७)

मनाच्या विविध अवस्था, त्याच्या विविध भावांसह कवी प्रकट करतो. संध्याकाळच्या वेळी मन अधिकच उदास होते. त्याला सतत कोणाची तरी आठवण येत राहते. त्यामुळे या जगापासून दूर जिथे कुठेतरी कोलाहल नसेल तिथे बसावे असे कवीला वाटते. हे कोलाहलाचे जग म्हणजे नवी यंत्रयुगीन संस्कृती आहे. त्यामधील मानवी जीवनाची शोकांतिका कवी स्पष्ट करतो आहे.

१९५०-६० हे नवकाव्याचे दशक म्हणून ओळखले जात होते. मर्ढेकरांनी त्यांना जाणवलेले जीवनातील दाहक वास्तव, हे आपल्या कवितेतून मांडले. मानवी सुख-दुःख, सांस्कृतिक मूल्यांचा झपाट्याने होणारा ऱ्हास, मानवी मनाची दोलायमान अवस्था यांना आपला काव्यविषय बनवले. या कालखंडात मागे-पुढे विंदा करंदीकर, वसंत बापट, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर हे सर्व कवी काव्यलेखन करत होते. या कवींची काव्यप्रवृत्ती भिन्न भिन्न स्वरुपाची होती.

या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या इंदिरा संतांच्या कवितेत जागोजागी 'मी' चे उल्लेख जसे येतात तसे भावव्याकूळ मनाचे संदर्भ येतात.

या कालखंडात काव्यलेखन करणारे विंदा करंदीकरांसारखे कवी अतिंद्रिय अनुभवाची, आत्मतत्त्वाच्या साक्षात्काराची ओढ आपल्या कवितेतून व्यक्त करतात, सत्याचा शोध घेत जीवनातील विसंगती टिपतात. तर कधी सुप्त मनाच्या चित्रणासाठी व्यक्तीच्या भोवतालच्या जीवनाचा तपशील करंदीकर आंतरिक जीवनात सूचित करणाऱ्या प्रतीकात्मक पातळीवर नेतात. (उदा. गर्भाधान, गाढ) जीवनात कोणासाठी वाट न बघतात स्वतःचा मार्ग आक्रमिणे बंधनकारक आहे. अशी जाणीव त्यांच्या कवितेत व्यक्त होते. माणसाच्या मनाने त्यासाठी खंबीर बनले पाहिजे. असा सल्ला ते देतात.

उदा. हा रस्ता अटळ आहे!
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय,
कुडकुडणारे हे जीव
पाहू नको, डोळे शीव..
माझ्या मना बन दगड

साम्यवादी शक्तीचा स्वार घोड्यावर बसून येत आहे. अन्याय सोसून सोसून दगड बनलेल्यांचा उपयोग तो स्वार शस्त्राला धार करण्यासाठी करील अशी कृतार्थता करंदीकर व्यक्त करतात. करंदीकरांनी शरीर आणि मन यांच्यातील एकात्मतात व्यक्त करणारी कविता लिहिली.

यानंतरच्या कालखंडातील कवितालेखन करणारी पिढी ही लघुनियतकालिकातून काव्यलेखन करवींची होती. या पिढीने १९६० ते ८० या दोन दशकातील कवितेत मोलाची भर घातली.गुरुनाथ धुरी, मनोहर ओक, वसंत दत्तात्रय गुर्जर, चंद्रकांत पाटील, नामदेव ढसाळ प्रभृतीत कवींची ही पिढी लघुनियतकालिकातून आपले मनोगत व्यक्त करू लागली. या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या काही कवींनी मानवी मनाचा स्पष्ट -अस्पष्टपणे धांडोळा घेतलेला दिसतो. परंतु सर्वच कवी मानवी मनाच्या त्याच्या विविध भावावत्यांचे स्पष्टपणे उल्लेख करत नाहीत. जगण्याच्या प्रक्रियेतला किमान एखादा क्षण सर्जनात रुपांतरित करण्याची धडपड हे कवी करतात.

१९६० च्या आसपास लिहू लागलेल्या काही कवींनी या रुढ, स्थिर, अचेतन कवितेचे सर्व बंध झुगारून मराठी कवितेत चैतन्य निर्माण केले. प्रत्यक्ष प्रक्रियेतून येणारे अनुभव हे कवी आपल्या कवितेतून मांडू लागूले. उदा. वसंत आबाजी डहाके यांची 'कीटक' कविता.

ईश्वर हा एक
प्रचंड कीटक आहे
माझ्या मनाची प्रसन्नता खाऊन टाकणारा
मी जरा आनंदाने हसलो की,
माझ्या कपाळावर उडी मारतो हा
त्याच्या चमकदार काळ्या पोटाखाली
अगदी झाकून जातात माझे डोळे (पृ. ९८)

'मनाची प्रसन्नता' खाऊन टाकणारा कीटक म्हणजेच ईश्वर आहे. ईश्वरामुळे मन प्रसन्न होते हा सामान्य माणसाच्या समजुतीला कवी छेद देतो.

या कालखंडात काव्यलेखन करणारे गुरुनाथ धुरी, यांची कविताही आपल्या जगण्याशी, त्यातील अनुभवाशी प्रामाणिक राहते. स्वतः कोणीतरी त्रयस्थ असून दुरून कुणाचे तरी शब्द ऐकत असल्याचा भास कवीला होतो. सुमुद्राकडे एकांतात पाहत असताना हा समुद्रच आता माणसाला शोधायला चालला आहे, असे कवीला वाटते. माणसाची सुख-दुःखे समुद्र ओरबाडून नेतो आहे.

उदा. पण कारकुनी जगात समुद्राला मज्जाव आहेत.
आणि क्षणभर थांबून मनापासून बोलावे
असे किनारेच आपल्याला सापडले नाहीत

रोजच्या धावपळीच्या जगात कुणालाही कुणापाशी थांबण्यासाठी वेळ नाही. त्यामुळे समद्रच माणसापाशी बोलायला येत आहे.

या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या ढसाळांची कविता सर्वसामान्यांच्या दारिद्र्याचा, अज्ञानाचा, दुःखाचा वेध घेते. तिरस्कार करते. 'कुत्रा आणि प्रजासत्ताकाचे गाणे' या कवितेत ते येथील लोकशाहीव्यवस्थेबद्दल असमाधान व्यक्त करतात. दलित विश्वातील दैन्य, दारिद्र्य, भुकेचा प्रश्न स्वातंत्र्य मिळूनही कायम राहिला आहे आणि तरीही 'सर्वंकष स्वातंत्र्याचे' नगारे वाजवले जात आहेत हे कवी सांगतो.

उदा. कुत्रा साखळीने बांधलेला कुत्रा तो विव्हळतो
भुंकतो अधूनमधून
वा त्याचा घटनात्मक हक्क आहे, तो जगतो
शिळ्या तुकड्यावर

अन्याय सहन करून कोडगं झालेले त्याचे मन विद्रोही मुहूर्तावर जर त्याने दिला हिसका साखळीला असह्य होऊन तोडू घातलं बंधन तर त्याला घातली जाते गोळी (पृ. ११५)

येथे प्रतीकात्मक पद्धतीने कवी माणसाच्या ठिकाणी कुत्र्याचा उल्लेख करतो. माणसाचे हक्क त्याला मिळाले नाहीत. प्रत्येकवेळी त्याला अन्याय सहन करावा लागतो. त्यामुळे त्याचे मन अधिकच कोडगे बनते. वर्षानुवर्षे अन्याय

सहन करणाऱ्या जनतेने विद्रोह केला तर त्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. कवी याठिकाणी 'कोडग्या मनाची' प्रतिमा वापरून येथील व्यवस्थेविषयीचे नैराश्य प्रकट करतो.

६० नंतरच्या कवितेने कवितेचा नवा संकेतव्यूह निर्माण केला. संज्ञाप्रवाही मुक्तसाहचर्य, वाक्यरचनेची मोडतोड, अनेकविध संभाषिताचा वापर करत ही कविता अधक व्यामिश्र होऊ लागली. अंतर्मुखतेकडून बहिर्मुखतेकडे असे या कवितेचे स्वरूप आहे. व्यामिश्रता, ताण, असंगती, तटस्थता आकाराला आली त्यामुळे मानवी मनाचे जे उल्लेख या कवितेत येऊ लागले ते रोमँटिक स्वरूपाचे राहिले नाहीत. अपवादात्मक परिस्थितीत ना. धों. महानोर, ग्रेस यांच्या कवितेत काही प्रमाणात ६० पूर्वीच्या भावकवितेला अनुसरणाऱ्या काही खुणा दिसतात. पण ६० पूर्वीच्या कवितेत येणाऱ्या प्रेमभावना, स्त्रीस्वरूपाचे विभ्रम साठोत्तरी कवितेत तुरळक झाले.

ऐंशीच्या दशकात गुरुनाथ धुरी चंद्रकांत पाटील, गुरुनाथ सामंत, नारायण कुलकर्णी, कवठेकर, विवेक मोहन राजापुरे इ. कवी साठोत्तरी पिढीप्रमाणेच आपले अस्तित्वाविषयक प्रश्न कवितेतून उपस्थित करताना दिसते. उदा. विलास सारंगांची 'नरभक्षक' (३५)

नरभक्षक तुम्हाला खायला सुरुवात करतो लिंगापासूनः
नरभक्षक असतो म्हातारा दंतहीन
किंवा त्याच्या खांद्याला घुसलेले असतात सायाळीचे काटे
प्रत्येक घराचं दार कड्याकुलपांनी जाम केलेल्या तुमच्या मनातून फेरी टाकताना
तो कण्हतो (पृ. ३५)

माणसामाणसामध्ये लपलेल्या हिंस्रवृत्तीचे दर्शन सारंगाची कविता घडवते.

वा नरभक्षक मनाचाही ठाव घेतो.

वसंत गुर्जरांनी आपल्या संज्ञाप्रवाही भाषिक शैलीत मानवी मनाचा वेध घेतला आहे.

उदा. गंभीर सात गंभीर क्षितीज सुने सात
गंभीर सात वर्षेफसकले बहर मन भळाभळा
वाहतय कसलं काय कसलं काय सर्वस्व
कोसळून पडलीयत
शांत अस्वस्थ भावनात गलबला बधीर
हृदय तुझ्यात उद्विग्न जळाऊ मन शांत
उदास माझ्यात तू (गुर्जर - अबकडई अंक ४)

गुर्जराची कविता माणसाच्या जगण्याचा गंभीरपणे विचार करते. माणसाला आलेला उदासीपणा नैराश्य यांचे चित्रण ती करते. 'उद्विग्न मना'मुळे झालेल्या वेदना त्यामुळे आलेले वैफल्य या कवितेतून स्पष्टपणे कळते.

१९६० च्या दरम्यान काव्यलेखन करणाऱ्या या कवींनी काव्यलेखन करताना मानवी मनाच्या विशिष्ट अवस्थांचा सूक्ष्मपणे विचार केलेला दिसतो. मनाची कधी कधी झालेली दोलायमान अवस्था कधी आनंदी अवस्था तर कधी त्याची खिन्नता ते या कवितेमधून प्रकट करतात. १९६० च्या कालखंडात लिहिते झालेले कवी हे साधारणतः १९८०-९० नंतरच्या काळात काव्यलेखन करत होते तअसे दिसते. पण ९० च्या सुमारास जागतिकीकरणामुळे झालेल्या बदलांचा, आधुनिक प्रसारमाध्यमांचा या पिढीच्या कवितांवर परिणाम झालेला दिसतो. ९० चे दशक हे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या क्रांतिकारक असेच दशक होते. खुल्या आर्थिक धोरणाच्या स्वीकाराचा जनसामान्यांच्या जगण्यावर परिणाम झाला. नवमध्यमवर्गाची मानसिकता नैतिक-अनैतिकतेची संकल्पना, भौतिक चंगळवाद याचे पडसाद कवितेतून उमटू लागले.

१९९० नंतरच्या कवितेतून मनाचा वेगळा असा विचार कवी करत नाहीत; पण जगताना बुद्धी आणि मन जो कौल देतात त्याविषयी हे कवी विचार करतात.

उदा. माणसं राहतात गावात
म्हणून गाव असतं माणसांचं
म्हणजे कायाय ही राहणाऱ्यांच्या वकुबा करून
ओळख सुरु होते गावाची
मंगेश नारायण काळेंची कविता (पृ. ३९)
समजा एका गावाची माणसं गेली दुसऱ्या गावात
तर नाही बदलता येत चेहरा दुसऱ्या गावात शिताफीत
म्हणजे फारच मनावर घेतले.
एका गावातून दुसऱ्या गावात जाणाऱ्यांनी
तर वस्ती बसवता येते फार्फार तर दुसऱ्या गावात

एका संपूर्ण गावाच स्थलांतर दुसऱ्या गावात गेलं तरी माणसांचं मूळ अस्तित्व बदलत नाही. कितीही माणसांनी मनावर घेतलं तर नवीन वस्ती बसवता येते; पण त्या गावाचा चेहरा बदलता येत नाही. काही ठिकाणी कवी प्रतीमांचा वापर करत मनाच्या अवस्थांचे वर्णन करतो.

उदा. ही जर्जर आरोळी भोवती
भरकटते आहे आतल्या आत काहीतरी
जसा उजेड फाकवतो मांड्या
उडून गेलेला कापूर मनाचा
जळून विझलेला बगळा
घालतो आहे शुभ्र रांगोळी

कापराची उडून जाण्याची नैसर्गिक प्रक्रिया ही मनावर आरोपित करून कवीन विरोधाभासाचे वातावरण तयार करतो.

नव्वदनंतर अवतरलेली नवीन अर्थ संस्कृती, त्यातून उभे राहिलेले मॉल, कॉर्पोरेट कंपन्या, संगणक, इंटरनेट, दृश्यमध्ये, यांचे चकचकीत विश्व बोकाळलेला चंगळवाद या साऱ्यातून आजच्या माणसाच्या वाट्याला आलेले एकाकीपण, असुरक्षितता, दुभंगलेपण यांचे चित्रण ही कविता करू लागली. मानवी मनाची होणारी फरफट, त्याचे एकटेपण, त्यामुळे होणारी त्याची कोंडी याचा कवी नकळतपणे विचार करू लागला. बदललेली कौटुंबिक व्यवस्था, बदललेले नात्याचे संदर्भ, भावनांची नकळतपणे होणारी देवाणघेवाण कवितेतून प्रकट होते.

उदा. माझ्या मनातला लॅण्डस्केप
कसा काय वाहून गेला असेल
मुलीच्या मनात
आताशा समोर तर सर्वत्र पसरलेल्या
बिल्डिंगा
(हेमंत दिवटे)

आताच्या धकाधकीच्या जीवनात शहरीकरणामुळे बिल्डिंगांचे जाळे पसरलेले आहे. येणारी पिढी ही फक्त कल्पनेनेच मागच्या पिढीचे अनुभव स्वीकारत आहे. बदललेल्या पर्यावरणात, गुंतागुंतीच्या आयुष्यात सगळेच अनुभव घेणे या पिढीला शक्य नाही ही जाणीव या कवितेतून व्यक्त होते. समकालीन जीवनातील अंतर्विरोधही या कवितेतून व्यक्त होतात. उदा. श्यामसुंदर मिरजकर यांची ''मोर एक माहित नसलेली सत्यकथा'' ही कविता

मी माझ्या कन्येला
मोराचे रंगीत चित्र दाखविले
आणि म्हणालो

हा बघ मोर
छान छान आहे
ती डोळे विस्फारून
मोराकडे बघतच राहिली.
नंतर बारा वर्षांनी ती म्हणाली,
बाबा तुम्ही मोराचे सुंदर चित्र दाखवलेत
पण एक गोंधळच झाला
मोराला रंग आहे, पिसारा आहे
तुरा आहे नि तो नाचतोही छान
पण त्याला मन नाही
साधं सरळ जगणं माहितच नाही
लग्नाचा ड्रेस मरेपर्यंत घालतं का कुणी?

मोराचे चित्र, त्याचा मुखवटा म्हणजे आयुष्यातील बेगडी जगणाऱ्यांचा एक गट आहे. ज्यांना भौतिक गोष्टींच्या अधीन होऊन चंगळवादी वृत्तीने आयुष्य जगता येते; पण जीवनांतर्गत जी परिवर्तने होतात त्यांचे चिंतन करावे लागते. आणि त्यासाठी त्याला मन लागते. अंतर्मुख व्हावे लागते. मोराला पिसारा फुलवून नाचता येते, त्याची पिसे रंगीबेरंगी असतात. त्याचे बाह्यस्वरूप मोहक असते; पण त्याला साधं, सरळ जगणं माहित नाही. सामान्य माणसालापण बाह्य रुपाच्या गोष्टींना महत्त्व आहे असे वाटते, कारण अंतर्मुख होण्यासाठी, चिंतन करण्यासाठी मनच नाही. 'शक्तिपात्राचे सूत्र' या कवितेतही मनाच्या चंचलतेबद्दल मंगेश काळेंनी ज्या गोष्टी सांगितल्या त्या विचार करण्यासारख्या आहेत.

उदा. मन यंत्र मन तंत्र मन मंत्र
मन संत्र मन केळी मन चिकू
मन गाजर मन टमाटर मन गोभी
मन झेंडू मन गुलाब मन मोगरा
मन कटोरा मन झोळी मन आरोळी
मन मन का ये भेद होय
मण मण का बोझ ढोय
मन गुसाई मन फिरत है
मन को चैन न होय (पृ. ७३)

मनाची अवस्था एखाद्या चंचल पक्ष्याप्रमाणे झाली असून ते थाऱ्यावर नाही. प्रत्येक मन हे वेगळे असून मणामणाचे ओझे ते नकळतपणे वाहून नेते. रोजचे जगण्यातले ताण चिंता यामुळे ते जराही शांत राहू शकत नाही. ९० च्या काळात काव्यलेखन करणाऱ्या कवींनी मनाचा कधी भावूकपणे तर कधी तटस्थपणे विचार केलेला आहे.

आतापर्यंत आपण एकूणच मराठी कवितेमध्ये मनाची प्रतिमा कशी येत गेली याचा विचार केला. कवी आपल्या मनात सतत एक मूल्यसंघर्ष अनुभवत असते. आणि त्यातून निर्माण होणारे ताण विसर्जित करण्यासाठी कवितेकडे वळत असतो. अगदी अभिजनांपासून तळागाळापर्यंतच्या लोकांना भारून टाकवे ही किमया संतकवितेने केली. या संतकवितेने भाषा, समाजजीवन आणि संस्कृती या सगळ्यात स्थित्यंतर घडवले. आधुनिक काळात केशवसुतांपासून ते १९९० - २००० पर्यंतच्या कवींनी माणसाला जागवणारी तिची आत्मिक उर्जा प्रफुल्लित करणारी काव्यरचना करताना 'मना'ला केंद्र केले. आणि त्याचा विविध भावावस्थांना आपल्या कवितेत स्थान दिले. कधी प्रत्यक्षपणे तर कधी अप्रत्यक्षपणे मनाच्या ज्या छटा या कवितांमधून दिसून येतात त्या कविच्या सर्जनशक्तीचा प्रत्यय देतात. व्यक्तिगत व व्यावसायिक जीवन जगत असताना संवेदनशीलतेच्या अंगाने बधिर होत चाललेल्या समाजाला या कवितेने एक उभारी दिली.